# "तुकोजी पवार यांचे मराठयांच्या इतिहासातील योगदान एक अध्ययन"

**प्रा. डॉ. व्ही.जी. वसु**
**इतिहास विभाग प्रमुख , डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर, जि. अकोला.**



***प्रस्तावना :***

सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून आपली सत्ता उत्तर भारतावर प्रस्थापित करण्याचा मराठयांनी प्रयत्न चालू ठेवला. तेव्हा जी मराठयांची राजकीय घराणी नावलौकीकास आली. त्यामध्ये पवार घराणे अग्रगण्य होते. पवार घराण्यामधील पुरूषांनी आपल्या अंगच्या मर्दुमकीने महाराष्ट्राची सेवा केली. त्या पवार घराण्यातील साबूसिंग पवार प्रथम पुरूष आहेत. त्यांचाच पणतू तुकोजी पवार होय. इ.स. १७०७ मध्ये अहमदनगरला औरंगजेबाचे निधन झाल्यानंतर त्यांचा पुत्र आजमशहाने अहमदनगरहून उत्तरेकडील दोराहा गावी मुक्काम केला. तेव्हा शाहू महाराज निसटून दक्षिणेत आले असता, शाहू महाराजांची चुलती महाराणी ताराबाई शाहू महाराजांना राज्य देण्यास तयार झाली नाही. अखेर मराठयांच्या राजसत्तेचा निर्णय खेड लढाईने लागला. शाहू महाराज मराठी राज्याचे खरेखूरे छत्रपती बनले. सत्ता हाती येताच शाहू महाराजांनी अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. परंतु मार्च १७०८ मध्ये सातारा जिल्हयातील मसूरगावच्या देशमुखीबद्दल महादजी जगदाळे व यादव या दोन घराण्यांमध्ये संघर्ष उद्भवला. तो अंतीम निर्णयाकरीता शाहू महाराजांकडे आला. त्यावेळेस रायभानजी भोसले, परसोजी भोसले व हनमंतराव निंबाळकरांप्रमाणेच केरोजी पवारांनीही साक्ष दिली. तसेच शाहू महाराजांनी पवार घराण्यातील केरोजी, काळोजी व संभाजीला आपल्या पक्षात आणले. उभयबंधूमधील काळोजींना एकूण चार पूत्र होते. त्यामधील तुकोजी पवार एक आहेत. त्यांनी आपल्या कर्तबगारीने मराठी राज्याची एकनिष्ठपणे सेवा केली.

मराठे सरदार दरवर्षी उत्तरेत आपला अंमल प्रस्थापीत करण्याकरीता जात असे. त्या सरदारांमध्ये तुकोजी पवार होते. इ.स. १७१८ मध्ये मराठयांनी दिल्लीचे राजकारण आपल्या तंत्राने सुरू राहण्याकरीता जी मसलत केली. त्या मसलतीमध्ये तुकोजी पवार एकमेव होते. सय्यदबंधूंनी पेशवा बाळाजी विश्वनाथला आपले मदतीकरीता दिल्लीला बोलाविले. तेव्हा पेशवा निवडक सरदार घेवून गेला. त्या सरदारांमध्ये तुकोजी पवारही होते दिल्ली दरबारासमोर त्यावेळी जो भिषण रणसंग्राम झाला. त्यामध्ये १५०० मराठे सैनिकांना कापले गेले, तर ४०० सैनिक गंभीररित्या जखमी झाले. त्यावेळी तुकोजी पवारांनाही जखम झाली होती. तरीही त्यांनी न डगमगता चौथाई, सरदेशमखीच्या सनदा व रफीउद्दराजला सम्राट पदावर विराजमान होईपर्यंत तुकोजी पवार सारखे लढत राहीले. त्या पवार घराण्यातील उदाजी पवारांना पेशवा बाजीरावने गुजराथचा मोकासा दिला. त्याच घराण्यातील तुकोजी पवारांनी मोठया उत्सुकतेने माळवा जिंकून घेण्यासाठी पेशवा बाजीरावांना मदत केली. त्याचे चीज म्हणून माळव्यातील घासदाणा वसुलीची जबाबदारी तुकोजीकडे सोपविली. मराठयापासून माळव्याचे संरक्षण करण्याकरीता सम्राटाने सारखी धडपड सुरू केली. त्याचवेळेस पेशवा बाजीरावांना बुंदेलखंडच्या छत्रसालाने मदतीकरीता निमंत्रण पाठविले म्हणून पेशवा बाजीरावाने त्वरेने तुकोजी पवारांना तातडीने फौजेसह रवाना केले. तुकोजीने देवासमध्ये जावून आपला तळ दिला. त्यानंतर तुकोजी पवारांनी गुजरात, काठियावाड, कच्छ, सोरट आणि बुंदेलखंडामध्ये मराठयांचा प्रभाव प्रस्थापीत केला. ही बातमी सम्राटाला कळताच त्यांनी मराठयांना हाकलून लावण्याकरता सवाई जयसिंगाला रवाना केले. तेव्हा मराठयांची उज्जयीनी येथे सवाई जयसिंगाशी भेट झाली. यावेळेस तुकोजी पवारांनी जयसिंगाला चांगलेच अडचणीत आणले. तेथुन इ.स. १७३४ मध्ये तुकोजीने बुंदी संस्थानातून जावून राजपुतान्यामध्ये आपला अंमल बसविण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे राजपुत राजांचे डोळे खाडकन उघडले. राजपुतांनी मराठयांचा बंदोबस्त करण्याकरीता मेवाडमधील हर्दा या गावी १७ जुलै १७३४ रोजी जयसिंगाने राजपुत राजाची डाक येथे तातडीची बैठक बोलाविली.

मराठयांना माळवा व राजपुतान्यातून हाकलून लावण्याकरीता रामपुरा येथे सर्वानुमते निर्णय घेतला. परंतु जयसिंगाच्या वर्तनाची राजपुत राजांना शंका येताच त्यांनी आपले समर्थन मागे घेतले. या दुहीचा फायदा घेण्याचे दृष्टीने पेशवा बाजीरावने दतिया, ओडसे, भदावर, सुकलोरा, गुजरोलापछोर जाटवाडा येथून खंडणी वसुलीकरीता करार केला. त्या करारावेळी तुकोजीने महत्वपूर्ण भुमिका बजाविली. त्यांना शिक्षा करण्याकरीता दिल्लीहून सम्राटाने महंमदखान बंगशाची रवानगी केली. त्यामुळे तो जानेवारी १७३६ रोजी घोलपूरला जावून पोहोचला. परंतु मराठयांचा बंदोबस्त करण्याचे बळ महंमद बंगश मध्ये नव्हती म्हणून त्याने मराठयांशी तहाचे बोलणे लावले. त्याकडे साफ दुर्लक्ष करून तुकोजीने अडीचशे स्वारांची डाक तुकडी अंतरवेदीत रवाना केली. म्हणून कुक्षीचा किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. लूनावडा, ब्रासवाडा,

डोंगरपूर या प्रांतातून तुकोजी सारखा आगेकूच करीत १५ जानेवारी १७३६ रोजी मेवाड सीमेवर जावून पोहोचला त्यानंतर तुकोजी पवार, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर या सरदारांना पेशव्याने उदेपूरकडे रवाना केले. मागाहून स्वतः पेशवा बाजीराव गेला त्यांचे स्वागत करण्याकरीता तख्तसिंहास पाठविले. त्यांनी चम्पा बागेत पेशवा बाजीरावाचे सन्मानार्थ मोठा दरबार भरविला. त्यानंतर बाजीरावाने महाराण्याकडे बनेड परगणा व दीडलाख रूपयाची खंडणी देण्याची मागणी केली. ती महाराण्याने धुडकावून लावून साठ हजार रूपये देण्याचे कबूल केले. त्यामधील २३ रूपये तुकोजीला मिळाले. अशा प्रकारे खंडणी वसुल करीत करीत तुकोजी उदेपूरकडे पेशव्यांसोबत निघून गेला. तेथून ४ मार्च १७३६ रोजी तुकोजी बाजीरावांबरोबर किसनगड जवळील भीम बोलाव या ठिकाणी श्रृंगारलेल्या एका तंबूमध्ये जावून जयसिंगाची भेट घेतली. तेथून तुकोजीला भेलसा येथे वेढा देण्याचा पेशवा बाजीरावने आदेश दिला. तेव्हा तुकोजीने भेलसा गावावर आपला अंमल बसविला.

तुकोजी बुंदेलखंडमधील ओडसा (ओर्छा) दतिया, व नरवरहून पैसा वसुल करीत भदावर येथे जावून पोहोचला. व तेथून वीस लाख रूपयाची खंडणी वसुल करून दहा हत्ती जिंकून घेतले. त्याच वेळेस तुकोजीने अटकेपर्यंतचा प्रदेश काबीज केला. म्हणून त्यांचे पारिपत्य करण्याकरीता सम्राटाने सादतखान, मीरबक्षी, खानदौरान, वजीर कमरूद्दीन तसेच मोगल उमराव, जयपूरचा राणा सवाई जयसिंग, जोधपूरचा राजा अभयसिंह या राजपुत राजांना ताबडतोब दिल्लीत बोलाविले. त्यांचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने बाजीराव त्वरेने दिल्लीवर चालून गेला. यावेळी त्यांनी तुकोजी पवारांनाही बोलावून घेतले. परंतु बाजीरावाचा बंदोबस्त करण्याकरीता २८ मार्च १७३७ रोजी सम्राटाकडील मीर हसन कोका मराठयांवर चालून आला. त्याचा तुकोजी पवारांनी वरच्यावर निकाल लावला. तुकोजीच्या अंगचे वरील सर्व गुण पाहून पेशवा बाजीराव संतुष्ट झाला व त्यांनी तुकोजीला एक हत्ती देवून त्यांचा सन्मान केला. त्यानंतर तुकोजी पवारांनी बुंदेलखंड, दिल्लीमध्ये पराक्रम केला. त्याची बातमी ऐकून शाहू महाराज संतुष्ट झाले व त्यांनी तुकोजी पवारांना सेना सप्तसहस्त्री हा किताब देवून सन्मानीत केले. अशाप्रकारे मराठयांनी दिल्ली पाठोपाठच उत्तर हिन्दुस्थानातील अनेक लहान राजेरजवाडयांवरही मराठयांचा प्रभाव प्रस्थापित केला. तुकाजीच्या कार्याची चीज म्हणून देवास संस्थान तुकोजीकडे सुपूर्द करण्यात आले. ऑक्टोबर १७३२ पासूनच तुकोजी राजपुतांना व बुंदेलखंडामध्ये शिंदे होळकरांसोबत जावून त्यांनी अतुलनीय पराक्रम केला. प्रयाग, काशी, गया व मथुरा या हिंदूच्या तिर्थक्षेत्रावरही मराठयांनी प्रभाव प्रस्थापित केला. या ठिकाणी बाजीरावांने संरक्षण करतेवेळी तुकोजीने आपला जीव धोक्यात घालून आपली कर्तबगारी बजाविली.

पेशवा बाजीरावांचे निधनानंतर पेशवेपदी आलेले नानासाहेबांनी २१ ऑक्टोबर १७४० रोजी पुण्याहून उत्तरेकडे कुच केले. त्यांचेसोबत असलेल्या सम्राटाच्या अंतरवेदीतील प्रदेश लुटून त्यांचेवर दडपण आणले म्हणून सम्राटाने नानासाहेबांवर चालून जाण्याचा जयसिंगाला आदेश दिला. तेव्हा पेशव्याने त्वरेने तुकोजीला बोलावून घेतले. तुकोजीने जयसिंगाचा पाठलाग करीत आपली फौज दक्षिण तिरावरील प्रयागपर्यंत नेली. मराठयांसमोर आपला टिकाव लागत नाही हे लक्षात येताच त्यांनी आपला वकील आयामलला घोलपूरमध्ये असलेल्या नानासाहेबांकडे पाठविले. स्वतः जयसिंहाने १२ मे १७४१ रोजी पेशव्यांची भेट घेवून मराठयांची सनद मिळवून देण्याचे आश्वासन दिले. इ.स. १७४१ च्या उत्तर भारतावरील स्वारीवेळी नानासाहेब तुकोजीशी सल्लामसलत करीत असे.

तुकोजीने मे १७४६ मध्ये मोठया शौर्याने जैतपूरचे ठाणे जिंकून घेतले. यावेळी तुकोजीने दाखविलेला पराक्रम अतुलनीय होता. परंतु याचवेळेस जयपूरचा राणा सवाई जयसिंहाचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या राजगादीकरीता माधोसिंग व इश्वरीसिंह यांचेमध्ये यादवी उद्भवली तेव्हा मेवाडचा राणा जगतसिंहाचे मदतीने उद्भवणाऱ्या युध्दप्रसंगी माधोसिंहास मराठयांनी मदत केल्यास त्यांना वीस लाख रूपये देण्याचे कबुल केले. ही बातमी ईश्वरसिंहास कळताच त्यांनी आपला वकील आयामलला तुकोजी पवारांकडे पाठवून त्यांचेशी हातमिळवणी केली. त्याप्रमाणे तुकोजी पवाराने रात्रीचे वेळेस आक्रमण करून मेवाडच्या सैन्याला पळवून लावले. तेव्हा पेशवा नानासाहेब ९ जुलै १७४८ रोजी नेवाई स्वारीहून परत आला होता. त्यांनी कोटा जिंकल्या प्रकरणी तुकाजीची तारीफ केली. तुकोजी दुप्पट जोमाने एक हजार फौजेनिशी जयप्पा शिंदेबरोबर जावून त्यांनी बुंदेलखंड व राजपुतान्यातून खंडणी वसुली केली.

पठाणांनी सफदरजंगाचा पराभव केला म्हणून त्याचा सूड घेण्याकरीता वजीर सफदरजंगाने मराठयांकडे आपला वकील राजे जुगलकिशोर व दिवाण रामनारायण यांना पाठवून फौजेच्या खर्चाकरीता दररोज ३५००० रू. देण्याची तुकोजीला ग्वाही दिली. तुकोजी दुप्पट जोमाने वीस हजार चपळ घोडेस्वारानिशी कोळजळेश्वरचा बंगशअधिकारी शादीलखान पठाणावर चालून गेला त्यावेळी झालेल्या संघर्षात १५००० पठाण तुकोजीकडून ठार झाले. या घटनेने उत्तर भारतात तुकोजीचा दरारा वाढला. त्यानंतर तुकोजीने दोआबमध्ये आपला अंमल प्रस्थापीत करून फत्तेगडास वेढून टाकले. याचवेळी अलिमहंमदखानाचा पुत्र सादुल्लाखान १२००० रोहील्यांना घेवून बंगशच्या मदतीस आला. त्यांचेवर रात्रीच्या वेळेस तुकोजी पवारांनी तुफान गोळीबार केला. त्यामुळे किल्ल्यात आग लागून शत्रु सैन्यास हतबल व्हावे लागले. अखेर १९ एप्रिल १७५१ रोजी तुकोजीने फत्तेगड काबीज केला. यामुळे तीन कोटी रूपये व अंतर्वेदीतील २५ लाखाचा प्रदेश तुकोजीला मिळाला. फत्तेगड मोहीमेप्रसंगी तुकोजी पवारांनी पठाणांचा बंदोबस्त केला नसता, तर उत्तरेकडील सर्व पठाण व जमीनदार एकत्रित होवून त्यांनी मराठयांना उत्तरेतून हुसकावून लावले असते.

अहमदशहा अब्दालीने ६ मार्च १७५२ रोजी लाहोरवर ताबा मिळवून तो दिल्लीत आला तेव्हा सम्राटाने घाबरून जावून मराठयांना मदतीच्या मोबदल्यात ५० लाख रूपये देण्याचे कबूल केले. त्यावेळी काहीही मागेपुढे न पाहता तुकोजी पवार दिल्लीत जावून पोहोचला. ही बातमी अहमदशहा अब्दालील कळताच तो त्वरेने आपल्या मायदेशी निघून गेला. या यशस्वीतेकरीता सम्राटाने खुश होवून आग्रा आणि अजमेर हे दोन्ही ठाणे तुकोजीला दिले. याशिवाय तुकोजीने नारनोल, मथुरा, संबल मुरादाबाद व सांभेर येथील फौजदारीची सनद मराठयांचे नावे करून

दिली. तुकोजी पवार मार्च १७५३ मध्चे राजपूत राजेरजवाडयांकडील खंडणी वसुली करण्याकरीता रघुनाथ रावांबरोबर उत्तरेतच राहीला. परंतु वजीर सफदरजंग आपल्या पदाचा राजीनामा देवून अयोध्येकडे निघून गेला. या संधीचा फायदा घेवून सुरजमल जाटाने दिल्लीवर ताबा मिळविला. त्याचे पारिपत्य करण्याकरीता १७५२ च्या कराराप्रमाणे मराठयांना जाणे अगत्य होते. सुरजमल डिसेंबर १७५३ रोजी कुंभेरीला आला. ही संधी साधून तुकोजी पवारांनी जावे. १७५४ मध्ये कुंभेरीला वेढा घातला व तेथून ३० लाख रूपये खंडणी वसुल केली. त्यानंतर रघुनाथरावाचा आदेश मिळताच तुकोजी पवार आपल्या फौजेनिशी बिलेसिंगाचा पराभव करण्याकरीता मारवाडकडे रवाना झाला. यावेळी जयप्पा शिंदे व तुकोजी पवारांची एकूण ४०,००० फौज जमली. म्हणून घाबरून जावून बिलेसिंगाने भेडता किल्ल्यात आश्रय घेतला होता. त्याला गाठण्याकरीता रवाना झालेल्या तुकोजीने ऑगस्ट १७४८ मध्य प्रारंभी कृष्णगड जिंकून घेतला. हया घटनेची बातमी कळताच बिलेसिंग तुकोजी पवारावर तातडीने चालून आला. अखेर तुकोजीच्या फौजेने त्वरेने आगेकूच कीताच बिलेसिंग नागोरला पळून गेला. ही संधी साधून तुकोजीने १७ सप्टेंबर १७५४ रोजी भेडता शहराची तीन तास मनसोक्त लुट केली व लगेच नागोर शहराला वेढा दिला. तुकोजी सात ते आठ महिन्यांपासून नागोर सभोवताल वेढा देवून बसला होता. यावेळेस १६ डिसेंबर १७५४ रोजी झालेल्या संघर्षाच्या वेळी तुकोजी पवार लढता लढता धारातीर्थी पडला. अशाप्रकारे तुकोजी पवारांनी मराठयांच्या इतिहासात फार मोलाचे योगदान दिले हे मराठयांच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदवून ठेवलेले आहे.

### संदर्भ सुची :-

१. गुजर, मा.वि. पवार घराण्याचा इतिहास, पृ.क्र. १३१
२. गुजर मा.वि. (संपा.) पवार घराण्याच्या इतिहासाची साधने, लेखांक १०१
३. कवचाळे, गंगाधर कृष्णाजी - पवार विजय, प्रथमावृत्ती १९४३, पृ.क्र. १२५
४. सरदेसाई, गो.स. महादजी शिंदे यांची कागदपत्रे, ५४०, ५४३, ५४९
५. अत्रे, रघुनाथ कृष्ण - पवार घराण्याची बखर, १९४१ स्टेट प्रिंटींग प्रेस, पृ.क्र. १७
६. कवचाळे, गंगाधर कृष्णाजी - देवास के पवार राजघराणे के वीर पुरूषो का यश गान, प्रथमावृत्ती १९४०, पृ.क्र. ७९
७. लेले, काशिनाथ, कृष्ण - धार संस्थानचा इतिहास (धारच्या पवारांची कामगिगरी), पृ.क्र. २९
८. कुळकर्णी, अ.रा. मराठयांचा इतिहास खंड क्र. २.
९. ठाकूर वा.वा. - होळकर शाही इतिहासाची साधने-भाग १.
१०. पारसनिस द.ब. दिल्ली येथील मराठयांची राजकारणे भाग २.